देउु या लढा निर्धाराने ii
जगु या आत्मसन्मानाने ii

महिला तक्रार निवारण समिती

नवी मुंबई महानगरपालिका

माहीती पत्रक

(२०११ -२०१२)

कार्यालय पत्ता :-
etc, अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासूविधा केंद्र
सिडको समाजमंदिर,पहीला मजला, सेक्टर-०५,ऐरोली, नवी मुंबई

पार्श्वभूमी :-

गतकालिन भारतीय स्त्रियांना मिळणारा समाजातील दूय्यम स्थान, खालावलेला दर्जा व विविध क्षेत्रात त्यांची होणारी कुचंबना याचा विचार करता त्यांचा सामाजिक दर्जा उंचवण्याच्या दृष्टीकोनातुन भारतीय कायदयात विविध प्रकारे काही कायदेशीर हक्क व संरक्षण याबाबत तरतुद दिसून येते.

मा. सर्वोच्य न्यायालयातील विशाखा प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे ही भारत सरकारकडुन संविधानात प्रस्तूत करण्यात आली आहेत.त्यानुशंगाने दिनांक ०५/०१/२००४ च्या शासन निर्णयाद्वारे मंत्रालयातील सर्व विभागासहीत सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना महिला तक्रार निवारण समिती गठित करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे त्यानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

भारतीय संविधानात असलेल्या तरतुदीप्रमाणे **अनुच्छेद १४,१५,१६** अन्वये स्त्रियांना असलेले मुलभुत हक्क त्यांना मिळवुन देण्याचा उददेश यात दिसून येतो.

कामाच्या ठिकाणी होणारी स्त्रियांची कुचंबना रोखण्यासाठी तसेच कामाच्या ठीकाणी त्यांचा दर्जा टिकुन रहावा यासाठी **नवी मुंबई महानगरपालिकेत महिला तक्रार निवारण समितीची** स्थापना करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समितीची स्थापना:-

अर्थाजन करणा-या स्त्रियांना होणारा मानसिक त्रास तसेच कामाच्या ठिकाणी होणारी त्यांची कुचंबना यास आळा बसावा यासाठी **नवी मुंबई महानगरपालिकेत महिला तक्रार निवारण समितीची** स्थापना करण्यात आली आहे. **मा. सचिव महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक कंमांक मकचो २००६ प्र.क्र.१०मकअ दि१७/०५/२००६ अन्वये** शासकिय निमशासकिय कार्यालयांना महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.त्यानुशंगाने नवी मुंबई महानगरपालिके अंर्तगत **महिला तक्रार निवारण समिती** स्थापना दिनांक१७/०५/२००६ रोजी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समितीचे सदस्य पुढिलप्रमाणे आहेत-

अ.क्र	अधिकारी/कर्मचा-यांचे नाव	विभागीय पद	कार्यरत विभाग	समितीमधील पद	दुरध्वनी व विस्तारीत क्रमांक
१.	सौ. वर्षा भगत	संचालक	e.t.cअशिप्रसेकें	अध्यक्ष	२७७९ ५५ ०१
२.	श्री. सर्जेराव परांडे	समाज विकास अधिकारी	योजना विभाग	सदस्य	०२२-२७५७९१०१
३.	सौ. स्नेहलता चव्हाण	सहाय्यक अधिसेविका	सार्व.रूग्णा वाशी	सदस्य	२७८९ ९९ ०१ ते ०५ वि.क्र. १०९
४.	सौ. माधुरी सेवलकर	परिसेविका	सार्व.रूग्णा वाशी	सदस्य	९८२०५८२३२२
५.	सौ.स्वप्ना पुजारी	व.लि.क.नि	ऐरोली विभाग कार्यालय	सदस्य	२७६९ २१ १४
६.	सौ. विद्या चव्हाण	व.लि.क.नि	लेखा विभाग	सदस्य	२७५७ ७० ७०/ २७५७ ५७ ०० वि.क्र.३१५
७.	श्रीम. स्वरा कासले	व.लि.क.नि	योजना विभाग	सदस्य	२७५७ ९१ ०१
८.	श्रीम. ज्योती मिसाळ	लि/टंक	e.t.cअशिप्रसेकें	सदस्य	२७७९ ५५ ०२
९.	श्रीम.प्रज्ञा क्षिरसागर	मानसोपचार तज्ञ	e.t.cअशिप्रसेके	सदस्य	२७७९ ५५ ०१
१०.	सौ. वृषाली मगदूम	स्त्री मुक्ती संघटना,	नवी मुंबई	अशासकिय सदस्य	९३२२२५५३९०

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समितीची उदिदष्टे:-

१.नवी मुंबई महानगरपालिकेतील अर्थाजन करणा-या महिलांच्या होणा-या कुचंबणेला आळा बसावा.

२.नवी मुंबई महानगरपालिकेतील विभागात काम करताना स्त्रियांना मिळणारा दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे.

३ स्त्री कर्मचा-यांना आपल्या विभागात आत्मविश्वासाने आणि उत्साहाने काम करता यावे.

४. नवी मुंबई महानगरपालिकेत काम करणा-या महीलांच्या कामाच्या ठिकाणी होणा-या समस्या जाणुन घेउुन त्यावर योग्य त्या अपाययोजना सुचवणे व कार्यवाही करणे.

५. महिला कर्मचारी वर्गास समान संधी व हक्क या तरतुदीचा फायदा व्हावा.

६.कार्यालयात काम करणा-या कमहिलांसाठी निरोगी व निकोपाचे वातावरण असणे हा प्रत्येक स्त्री कर्मचा-यांचा हक्क आहे व तो मिळवुण देण्याचा प्रयत्न करणे.

७.महिला कर्मचारी वर्गास योग्य ते मार्गदर्शन करणे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समितीची कार्यपध्दती -

१.महिला तक्रार निवारण समितीत एक अध्यक्ष ,एक अपाध्यक्ष, तसेच एक अशासकीय सदस्य व इतर सदस्य यात एक पुरुष कर्मचारी यांचा समावेश असेल.

२.लेखी तक्रार धेणे व कार्यवाही करणे.

३.प्राप्त तक्रारी संर्दभात बैठक व चर्चा आयोजित करणे.

४.प्राप्त तक्रारी संर्दभात चौकशी करणे.

५.दोन्ही पक्षाचे म्हणणे (बाजू) ऐकून धेणे.

६.प्राप्त तक्रारी संर्दभात योग्य तो सल्ला व मार्गदर्शन करणे.

७.प्राप्त तक्रारी संर्दभात चौकशी अहवाल सादर करणे.

८.महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९९७ नुसार तक्रारी संर्दभात दोषारोप पत्र तयार करून ते संबंधित अधिका-यावर बजावणे.

९.निर्णयाची एक प्रत ही महाराष्ट्र राज्य महीला तक्रार निवारण समितीस सादर करणे.

१०.महिला तक्रार निवारण समितीचा वार्षिक अहवाल हा महाराष्ट्र राज्य महीला तक्रार निवारण समितीस सादर करणे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समितीचे विषेश अधिकार -

१.महिला तक्रार निवारण समिती ही एक वैधानीक व स्वयंशासित संस्था असेल.

२.चौकशीची शहानिशा करून दिलेला चौकशी अहवाल महिला तक्रार निवारण समिती सादर करू शकेल व तो अंतिम समजला जाईल.

३.चौकशी संर्दभात कोणत्याही कार्यालयातून सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत महिला तक्रार निवारण समिती मागवु शकेल.

४.चौकशी करताना चौकशी संबंधित कोणत्याही व्यक्तीस महिला तक्रार निवारण समिती हजर राहण्यास फर्मावू शकेल.

५. चौकशी संर्दभात दस्तऐवज शोधून काढण्यास व तो सादर करण्यास महिला तक्रार निवारण समिती फर्मावू शकेल.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समिती बाबत उपक्रम:-

१. विविध समस्यांवर स्त्रियांना योग्यरीतीने मार्गदर्शन करणे.

२. महिलांच्या कायदेशिर तरतुदींवर मार्गदर्शन करणे.

३.महिलांकरीता मार्गदर्शनपर विविध विषयांवर शिबिर आयोजित करणे.

४.वर्षातून दोन वेळा सर्व नवी मुंबई महानगरपालिका महिला कर्मचा-यांची बैठक आयोजित करणे.

५.शिस्तभंग कारवाई करणे.

६.लैंगिक शिक्षण देणे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला तक्रार निवारण समितीमध्ये

आपली तक्रर कोणाकडे नोंदवाल ?

महिला तक्रार निवारण समिती सदस्य :- **श्रीम.ज्योती तानाजी मिसाळ.**

दूरघ्वनी क्रमांक-०२२-२७७९५५०१.

संपर्क -

etc, अपंग शिक्षण ,प्रशिक्षण व सेवा सूविधा केंद्र ,ऐरोली.
सिडको समाजमंदिर, सेक्टर-०५ चिंचवली उदयानाजवळ
नवी मुंबई महानगरपालिका-४००७०८
महाराष्ट्र राज्य.
दूरघ्वनी क्रमांक-०२२-२७७९५५०१.

तक्रार नोंदविण्याचा वार व वेळ-

प्रत्येक मंगळवार व गुरुवार

सकाळी १०.३० ते ०४.३० वाजेपर्यंत

समितीची वेब साईट -www.nmmconline.com